

# ठकसेन आल्डर

फिनलंडमधली लोककथा

मूळ लेखक : मौली

मराठी : नीलांबरी जोशी



# ठकसेन आल्डर

## फिनलंडमधली लोककथा

मूळ लेखक : मौली

मराठी : नीलांबरी जोशी



कोणे एके काळी फिनलंडमधल्या एका गावात अल्डर रहात होता . लोकांना फसवण्यात तो पटाईत होता. त्यामुळे लोक त्याला ठकसेन अल्डरच म्हणत.

आपल्याला अल्डर फसवूच शकत नाही असं त्या गावातल्या एका माणसाला वाटायचं.



तो माणूस नेहमी एका मोठ्या बकरीवर बसून हिंडायचा.

त्यामुळे लोक त्याला बकरी सरदारच म्हणायचे.  एक दिवस बकरी सरदाराची अल्डरशी भेट झाली.  तेव्हा आल्डर एका भोजवृक्षाला चिकटून उभा होता.

“अल्डर, तू फसवण्यात कितीही हुशार असलास,” बकरी-सरदार म्हणाला.  “पण, तू मला मात्र फसवू शकणार नाहीस!”

“मी तुला नक्कीच फसवू शकतो,” अल्डर म्हणाला, “पण मी माझी क्लृप्त्यांची पिशवी घरीच विसरुन आलोय”



“अरे, मग पटकन घरुन ती क्लृप्त्यांची पिशवी घेऊन ये बरं. मग आपण कोण कोणाला उल्लू बनवतंय ते पाहू !”
असं बकरी सरदार म्हणाला.

“आत्ता मला ते शक्य नाही” अल्डर म्हणाला “कारण मी आ्त्ता या भोजपत्राच्या झाडाला आधार द्यायला उभा आहे. मी आधार सोडला तर हे झाड कोसळेल.”

“चल, तू जाऊन येईपर्यंत मी झाडाला आधार देतो,” बकरी-सरदार म्हणाला. मग बकरी-सरदार झाडाला टेकून उभा राहिला आणि आल्डर बकरी घेऊन पिशवी आणायला गेला.



काही वेळानं बकरी सरदार झाडाला टेकून थकला, पण ठकसेन अल्डर काही पिशवी घेऊन आला नाही.

शेवटी बकरी सरदार थकून गावाच्या दिशेनं चालायला लागला. ते झाड काही पडलं नाही याचं त्याला आश्चर्यच वाटलं. तो म्हणसाला, “अल्डरनं मला यावेळी नक्कीच फसवलं आहे, पण परत मात्र तो असं करु शकणार नाही.”

मग पळत पळत बकरी सरदार गावात गेला.
त्याला आल्डर आणि आपली बकरी शोधायची होती.



रस्त्यात त्याला एक तळं दिसलं. अल्डरनं तळयात बकरीचं कातडं फेकलं होतं. ते कातडं तळयात मधोमध तरंगत होतं. बकरी सरदारानं ते कातडं पाहिलं आणि तो म्हणाला

“अरेच्चा, माझ्याच बकरीचं कातडं तरंगतंय वाटतं”

मग त्यानं आपला कोट आणि चपला काढून ठेवल्या. बकरीला वर काढायला तो तळयात उतरला.



बकरी सरदार तळयात उतरल्यावर अल्डर  काठावर असलेल्या झाडामागून बकरीला घेऊन बाहेर आला.

त्यानं बकरी सरदाराचा कोट आणि चपला उचलल्या आणि गावाच्या दिशेनं धूम ठोकली.



बकरी सरदाराला आपला कोट आणि चपला गायब झाल्याचं कळल्यावर तो तारस्वरात किंचाळला, “अल्डरनं मला दोन वेळा उल्लू बनवलंय. पण आता परत तो मला उल्लू बनवू शकणार नाही.”

मग तो अल्डर, बकरी, कोट आणि चपला शोधायला गावाच्या दिशेनं निघाला.



थोडा वेळ चालल्यावर त्याला आपली एक चप्पल रस्त्यावर दिसली. त्यावर तो म्हणाला, “एक चप्पल मिळून काय उपयोग, दुसरी पण चप्पल सापडायला हवी.”

मग तो ती चप्पल तिथेच ठेवून गावात परत आला.



थोडं पुढे गेल्यावर त्याला रस्त्यात दुसरी चप्पल पण दिसली. ती चप्पल घेऊन तो पहिली चप्पल शोधायला परत गेला. पण तोपर्यंत त्याची पहिली चप्पल तिथून गायब झाली होती. ठकसेन अल्डरनं तोपर्यंत ती चप्पल तिथून उचलली होती.

बकरी सरदारानं आपल्या मुठी आवळल्या आणि तो म्हणाला "अल्डरनं मला तीन वेळा फसवलंय पण आता मात्र तो मला फसवू शकणार नाही"

मग तो अल्डर, बकरी, कोट आणि चप्पल शोधायला गावाच्या दिशेनं निघाला.



शेवटी बकरी सरदार अल्डरच्या घरी पोचला.

त्याला येताना पाहून अल्डरनं एक ससा पिशवीतून काढला आणि आपल्या बायकोला दिला.

मग अल्डर वरच्या मजल्यावरच्या एका खोलीत जाऊन लपून बसला.



अल्डरची बायको ससा घेऊन दार उघडायला गेली.

बकरी सरदारानं विचारलं, “अल्डर घरात आहे का?”

“नाही,” अल्डरची बायको म्हणाली, “तो जंगलात गेलाय. तुम्ही आत येऊन बसा. मी त्याला आणायला या सशाला पाठवते”

मग  ती तो ससा घेऊन आत गेली.



बायकोनं वरच्या मजल्यावर जाऊन ससा अल्डरच्या हातात दिला.  पळत पळत येऊन बकरी सरदाराच्या समोर उभी राहिली.



थोड्या वेळानं अल्डर दरवाजापाशी आला. त्याच्या हातात तोच ससा होता. तो बायकोला म्हणाला, “हा ससा मला बोलवायला आला. म्हणून मी धावतपळत घरी आलो”

बकरी सरदार त्या सशाकडे आश्चर्यानं पहायला लागला.



“तुझा ससा तर भलताच अजब आहे,” बकरी सरदार म्हणाला. “मला तो विकत देतोस का?”

“तुला चालत असेल तर पंचवीस रुबल्सना घेऊन जा,” अल्डर म्हणाला.

मग बकरी सरदारानं अल्डरला पंचवीस रुबल्स दिले आणि अल्डरनं ससा बकरी सरदाराच्या हातात ठेवला.

मग बकरी सरदार तो ससा घेऊन आनंदानं आपल्या घरी गेला.



घरी पोचल्यावर बकरी सरदारानं आपल्या बायकोला सूप बनवायला सांगितलं.

तो म्हणाला, “मी लाकडं तोडायला जंगलात चाललोय. सूप तयार झाल्यावर या सशाला सोडून दे.  तो मला जंगलातून बोलावून आणेल”



मग कुऱ्हाड घेऊन बकरी सरदार जंगलात गेला. खूप वेळ तो लाकडं तोडत होता. शेवटी तो एकदम थकून गेला. पण ससा काही त्याला बोलवायला आला नाही.

अखेरीस तो घरी गेला.  त्यानं आपल्या बायकोला विचारलं “तू मला बोलवायला सशाला का बरं पाठवलं नाहीस?”

“मी दाराबाहेर सशाला ठेवलं आणि तुम्हाला बोलवून आणायला सांगितलं. पण तो ससा थेट अल्डरच्या दिशेनं पळाला.”



परत एकदा मुठी आवळून बकरी सरदार म्हणाला , "अल्डरनं मला चार वेळा उल्लू बनवलंय. पण आता परत तो मला उल्लू बनवूच शकणार नाही. "

मग तो बकरी, कोट, चप्पल आणि पैसे आणायला अल्डरकडे निघाला.



अल्डरनं बकरी सरदाराला आपल्या घराकडे येताना पाहिलं, तेव्हा तो चांदीची नाणी घेऊन तबेल्याच्या दिशेनं गेला.

त्यानं ती नाणी घोड्याच्या शेपटीत लपवली.

मग तो घोड्याला प्रेमानं काळे चणे खाऊ घालायला लागला.



बकरी सरदारानं अल्डरच्या बायकोला विचारलं, "अल्डर घरात आहे का?"

"हो" अल्डरची बायको म्हणाली, "तो तबेल्यात आहे"

बकरी सरदार तबेल्यात पोचला तेव्हा अल्डर घोड्याला काळे चणे खायला घालत होता.

"तू घोड्याला काळे चणे का बरं खायला घालतोयस?"



" जरा थांब. मी घोड्याला काळे चणे का खायला घालतो ते तुला दाखवतो". अल्डर म्हणाला.

मग अल्डरनं घोड्याला एका काठीनं स्पर्श केला. मग घोड्यानं आपली शेपटी हलवली आणि त्यातून चांदीची नाणी खाली पडली.

बकरी सरदाराला ती नाणी पाहून आश्चर्याचा धक्काच बसला.



“तुझा घोडा तर भलताच अजब आहे रे,” बकरी सरदार म्हणाला. “मला तो विकत देतोस का?”

“त्यासाठी पाचशे रुबल पडतील,” अल्डर म्हणाला.

मग बकरी सरदारानं अल्डरला पाचशे रुबल दिले आणि अल्डरनं घोडा बकरी सरदाराच्या हवाली केला.

मग बकरी सरदार घोड्यावर बसून घरी गेला.



घरी पोचल्यावर तो आपल्या बायकोला म्हणाला, “बघ, मी किती अद्‌भुत घोडा घेऊन आलोय”

मग बकरी सरदारानं एका काठीनं घोड्याला स्पर्श केला. घोड्यानं आपली शेपटी जरुर हलवली, पण एकही नाणं काही खाली पडलं नाही. आता बकरी सरदारानं डोक्यावरच हात मारुन घेतला आणि तो किंचाळला, “अल्डरनं मला पाच वेळा फसवलं, पण आता परत मात्र तो मला फसवू शकणार नाही”

परत एकदा तो आपली बकरी, कोट, चप्पल आणि रुबल आणायला आल्डरकडे निघाला.



रस्त्यात बकरी सरदाराला त्याचा धाकटा भाऊ भेटला. त्यानं मग आपल्या भावाला, अल्डरनं कशी त्याची बकरी, कोट, चप्पल आणि रुबल्स सफाईनं लुटले ती रामकहाणी सांगितली.

त्याचा भाऊ म्हणाला, “माझ्याकडे एक मोठं पोतं आहे. आपण अल्डरला त्या पोत्यात भरु, ते पोतं बांधून नदीत फेकून देऊ. मग अल्डर कधीच कोणाला फसवू शकणार नाही.”



त्यानंतर बकरी सरदार आणि त्याच्या भावानं मिळून अल्डरला पोत्यात भरलं. पोतं दोरीनं करकचून बांधलं आणि ते नदीत  फेकून दिलं.

थोड्या वेळानं पोतं नदीतून वाहत किनाऱ्यावर आलं. मग बकरी सरदार आणि त्याचा भाऊ या दोघांनी मोठा बांबू आणून पोतं परत नदीत ढकललं.





पण अल्डरच्या खिशात एक चाकू होता.

त्यानं पोत्याची दोरी कापून तो बाहेर आला.

मग त्यानं पोत्यात दगड आणि भुस्सा भरला. ते पोतं परत बांधून ठेवलं.

मग अल्डर किनाऱ्यावर एका झाडामागे लपला. त्यानं बकरी सरदार आणि त्याच्या भावाला एक मोठा बांबू घेऊन येताना पाहिलं. त्यांनी ते पोतं परत नदीच्या मध्यभागी फेकलं.

त्यानंतर अल्डर दोन दिवस गावात फिरकलाच नाही.

मग त्यानं दहा गायी विकत घेतल्या.  तिसऱ्या दिवशी तो बकरी सरदाराच्या घरासमोर गायी हाकायला लागला.

बकरी सरदार आणि त्याचा भाऊ अल्डर आणि त्याच्या दहा गायींकडे डोळे फाडफाडून बघतच राहिले.



ते म्हणाले “अल्डर, या गायी तू कुठून आणल्यास?”

“अरे,” अल्डर म्हणाला, “मला पाण्याखाली या गायी मिळाल्या.  तिथे शेकडो गायी होत्या. पण मला दहा गायीच आणता आल्या ”



“मला पण पोत्यात बांधून नदीत फेका,” बकरी सरदार म्हणाला. “मला पण गायी हव्या आहेत”

मग अल्डरनं बकरी सरदाराला पोत्यात बांधुन नदीत फेकलं.

थोड्या वेळातच बकरी सरदार ओरडायला लागला. तेव्हा अल्डर बकरी सरदाराच्या भावाला म्हणाला, “बघ, तो गायींना हाका मारतोय.”



मग बकरी सरदाराचा भाऊ म्हणाला, हो “मला पण पोत्यात बांधून नदीत फेका. मी पण तिथून थोड्या गायी घेऊन येतो”

मग अल्डरनं त्यालाही पोत्यात बांधून नदीत फेकलं.

थोड्या वेळातच बकरी सरदाराचा भाऊदेखील किंचाळायला लागला.



थोड्या वेळानं अल्डरनं ती दोन्ही पोती नदीबाहेर काढली. पोत्यावरची दोरी कापून दोघांना पोत्याबाहेर काढलं.

अल्डरला त्या दोघांकडे पाहून हास्याच्या उकळ्या फुटत होत्या.

त्यानं बकरी सरदाराला विचारलं, “सांग मी तुला किती वेळा उल्लू बनवलं?”

“तू मला सहा वेळा उल्लू बनवलंस. पण आता मला परत तुझ्याकडून फसायचं नाही”



मग अल्डरनं बकरी, कोट आणि चप्पल बकरी सरदाराला परत दिली.

पण त्यानं रुबल्स मात्र आपल्याकडेच ठेवले, कारण अल्डरनं आपल्याला सहा वेळा अद्दल घडवली आणि फसवलं हे बकरी सरदाराच्या कायम लक्षात रहावं असं त्याला वाटत होतं.

